गट-अ आणि गट-ब(राजपत्रित) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या प्रतिवेदन वर्षांच्या कार्यमूल्यमापन अहवालाबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सीएफआर १२१८/प्र.क्र ३२/१३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा</u> :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/ २०१०/तेरा, दि. ०१.११.२०११
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/तेरा, दि. ०२ फेब्रुवारी, २०१७.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/तेरा, दि. ०७ फेब्रुवारी, २०१८.

शासन परिपत्रक -

गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवालामध्ये दि. ०२.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून नवीन कार्यमूल्यमापन अहवाल सन २०१६-१७ या प्रतिवेदन वर्षापासून लागू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गट-ब(राजपत्रित) आणि गट-क संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी कार्यमूल्यमापन अहवालाचा सुधारित नमुना दि. ०७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आला असून सदर नमुना सन २०१७-१८ या प्रतिवेदन वर्षापासून लागू करण्यात आला आहे. तथापि, सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वीच काही अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल दि. ०१.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये प्रतिवेदित व पुनर्विलोकित करण्यात आले होते. त्यामुळे अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीच्यावेळी व अन्य सेवाविषयक बाबीसाठी सदर कार्यमूल्यमापन अहवाल ग्राहय धरावे किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. या संदर्भात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

अ) गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांचे सन २०१६-१७ चे कार्यमूल्यमापन अहवाल, त्यांचे प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारी यांची सेवानिवृत्ती किंवा बदली या कारणास्तव दि.०१.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये दि. ०२.०२.२०१७ पूर्वी अंतिम झालेले असल्यास सदर कार्यमूल्यमापन अहवाल पदोन्नती व अन्य सेवाविषयक बाबींसाठी ग्राहय धरण्यात यावेत.

आ) गट-ब (राजपत्रित) आणि गट-क संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचे सन २०१७-१८ चे कार्यमूल्यमापन अहवाल, त्यांचे प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारी यांची सेवानिवृत्ती किंवा बदली या कारणास्तव दि.०१.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये दि. ०७.०२.२०१८ पूर्वी अंतिम झालेले असल्यास सदर कार्यमूल्यमापन अहवाल पदोन्नती व अन्य सेवाविषयक बाबींसाठी ग्राहय धरण्यात यावेत.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक २०१८०२२६१६१९४७९८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhatu Sambhu Wankhede

Digitally signed by Bhatu Sambhu Wankhede
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=493af62b137d3b8ad2fb93133b4b083c9cafb89b6793bfa8d7ebb7ba735e6d9d, serialNumber=454f1eaad82ae32f06775522a32735d46dc9a815a777254a802deaa980512d11, cn=Bhatu Sambhu Wankhede
Date: 2018.02.26 16:23:58 +05'30'

(भ.सं.वानखेडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. सर्व मंत्रालयीन विभागांच्या सर्व आस्थापना शाखा
३. निवडनस्ती, कार्यासन १३, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२